**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्य आणि विविध वाङ्.मय प्रकार

प्रा. डॉ. काळे बी. एम.
संशोधक मार्गदर्शक व मराठी विभाग प्रमुख, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ,

तेराव्या शतकात महाराष्ट्रात उदयास आलेला सर्वात महत्त्वाचा संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय. भागवत संप्रदाय, वारकरी संप्रदाय व भक्ती संप्रदाय या नावाने हा संप्रदाय ओळखला जातो.पांडुरंगाला महासमन्वयक मानून संत नामदेवांनी अठरापगड जातीतील लोकांना एकत्र करून या सांप्रदायचा पाया रचला. संत नामदेव हे वारकरी संप्रदायातील आद्य पुरुष होत. कर्मटपणा, वर्तवैकल्य , संन्यास इत्यादी गोष्टीचा त्याग या संप्रदायाने शिकवला. न लगे सायास जावे वनांतरा सुखे येतो घरा नारायण. हे स्वतःच्या उदाहरणांनी संतांनी पटवून देऊन सहज ,सुलभ, सोप्या अशा भक्तिमार्गाची शिकवण त्यांनी दिली.अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ, त्याच्या गळा माळ असो नसो.अशा कुणाही व्यक्तीस सामावून घेण्यासाठी मनाची विशालता त्यांनी दाखवली.चुकलेल्यांना फजित करणे,पाखंडाचे खंडन करणे. हाच धर्म अशी डोळसदृष्टी संतांनी दिली. दया, क्षमा,शांती,अहिंसा या समाज जीवनास आवश्यक असणाऱ्या मूल्यांचे स्मरण त्यांनी घडविले. जनात जनार्दन शोधून विठ्ठलाच्या वीरांनी समाजाला एक नवी जीवननिष्ठा दिली.आपले विचार सर्वसामान्यांच्या गळी उतरविण्यासाठी त्यांनी जे विविध रचनाप्रकार हाताळले त्याचा विचार आपल्याला या शोधनिबंधात करावयाचा आहे

1) **ओवी:-**

ओवी हा अतिशय प्राचीन लोकगीत प्रकार आहे प्रामुख्याने स्त्रिया दळताना किंवा काडताना ओव्या गातात. प्रारंभीच्या काळात ओवी तीन चरणाची लिहिली जात असली तरी नंतर नंतर ती साडेतीन-चार आणि क्वचित पाच चरणाची लिहिली गेलेली आढळते. हिच्या चरणाची अक्षर संख्या निश्चित नसते. अक्षरसंख्येप्रमाणेच अर्थाच्या दृष्टीने ओवीची बांधणी विविध प्रकारची असते. गेय असणाऱ्या या वांग्मय प्रकारांमध्ये आपल्या भावभावना व्यक्त करण्यासाठी प्राचीन काळी स्त्रियांनी अनेक प्रसंगावर गाणी रचली आहेत.ओवीचा अर्थ ओवणे,गुंफणे,ग्रंथन करणे असा आहे. संत ज्ञानेश्वरांनी गीतेवर जी टीका केली त्यात 700 श्लोकावर मूळ अध्याय आणि क्रम न बदलता 9000 ओव्यांचे ज्ञानेश्वरी हे परमसुंदर भाष्य लिहिले आहे. त्यांची ओवी ही साडेतीन चरणाची आहे.जे जे भेटीजे भूत ,ते ते मानिजे भगवंत, हा भक्त योग निश्चित जाण माझा. या ओवीतील पहिले तीन चरण पूर्ण असून शेवटचे चरण अर्धे आहे. लोक परंपरेतून आलेल्या ओवी या रचना प्रकाराचा संतांनी फार मोठ्या प्रमाणात वापर केला.

**2) अभंग:-**

बहुतेक संतांनी ओवी आणि अभंग या दोन छंदातून लेखन केले आहे ज्या रचनेत छंदभंग होत नाही अशा रचनेला संत नामदेवांनी समचरणी अभंग या नावाने संबोधले आहे. अभंगाचे दोन प्रकार आहेत मोठा अभंग आणि लहान अभंग पहिल्या प्रकारात तीन सहा अक्षरी चरण आणि चौथा चरण

चार अक्षरी असतो. लहान अभंगात आठ अक्षरी ओळींची जोडी असते. वरील दोन्ही प्रकारात संतांनी रचना केली आहे. या रचना प्रकारात एक प्रकारची लयबद्धता साधलेली असते. एखाद्या अक्षराचा उच्चार दीर्घ अथवा निसटता करून रचना मर्यादित करता येते. अभंगातील गेयता अक्षरनिष्ठ असते.रचनेतील लवचिकपणा भावकाव्यात्मकता आणि स्फुटत्व हे या रचनेचे विशेष होत. साक्षात्कारासारखा श्रेष्ठ अध्यात्मिक अनुभव आणि जातीनिर्मित दिनत्वाचे शल्य प्रगट करणारा अनुभव असे लौकिक अलौकिक अनुभवाचे विस्तृत क्षेत्र अभंग रचनेने व्यापलेले आहे. अभंग या चरना प्रकारात सर्वच संतांनी अभंग लिहिले असले तरी संत तुकारामांनी सुमारे 5000 अभंग रचल्यामुळे वारकरी संप्रदायात अभंग तुकयाचे असे म्हटले जाते.

3) **भारुड:-**

अभंगाप्रमाणेच भारुड या रचना प्रकारात अनेक संतांनी लेखन केले आहे. भारुड रचना अनेक कवींनी केली असली तरी भारुडांशी एकनाथांचे नाव जेवढे जोडले गेले आहे. तेवढे अन्य कवींचे जोडले गेलेले दिसत नाही. एकनाथांची भारुडे अतिशय वेधक असून ती लोकप्रिय आहेत.भारुड या शब्दाची उत्पत्ती बहुरूड तेभारुड अशी सांगितली जाते. भारुड या शब्दाचा दोन तोंडाचा पक्षी असा अर्थ आहे. भारुडाला दोन तोंडे म्हणजे दोन अर्थ असतात. वरवरचा एक अर्थ असतो आणि आत अध्यात्म असते. यामुळे ही कदाचित या रचना प्रकाराचे भारुड हे नाव रूढ झाले असावे. भारुड हा गीत प्रकार असून तो नाट्यानुकूल आणि प्रेक्षक सापेक्ष आहे अनेक संतांनी भारुड हा रचनाप्रकार लोकप्रिय केलेला आपल्याला दिसून येतो. संत एकनाथांनी अध्यात्म सर्वसामान्य माणसांच्या गळी उतरविण्यासाठी त्यांनी लोक व्यवहारातील,लोकप्रपंचातील वेगवेगळी उदाहरणे,दृष्टांत देऊन अवघड असणारे तत्त्वज्ञान भारुडाच्या माध्यमातून सोपे करून सांगितले आहे. त्यामुळेच वारकरी संप्रदायात भारुड एकनाथाचे असे म्हटले जाते

4) **गवळण:-**

भारुडाप्रमाणेच संतांनी गवळण हा रचनाप्रकार हाताळला आहे. गवळण हा भारुडाप्रमाणेच स्वतंत्र व लोकप्रिय रचनाप्रकार आहे गवळण हा रचना प्रकार कृष्ण व गोपी यांच्यातील भावबंधावर आधारलेला असतो.वरवर शृंगार रसाचा परिपोष केलेला दिसत असला तरी अंतर्यामी भक्त आणि परमेश्वर यांच्यातील अद्वैत हा रचनेचा मुख्य घटक असतो.भारुडाप्रमाणेच गवळण हा गीत प्रकार नाट्यानुकूल आहे आणि प्रेक्षकसापेक्ष आहे. गवळणीतून परमेश्वराच्या सगुण, साकार रूपदर्शनावर भर दिलेला असल्यामुळे हा प्रकार सामान्यजणात लोकप्रिय आहे. गवळणी या शब्दाची उत्पत्ती गोपालिनी गवळणी अशी सांगितली जाते. हा प्रकार भजन कीर्तनाशी संबंधित आहे. संत एकनाथ,संत जनाबाई यासारख्या अनेक संतांनी गवळणी लिहिलेल्या आणि लोकप्रिय केलेल्या दिसून येतात. धरीला पंढरीचा चोर, गळा बांधुनिया दोर ही संत जनाबाई यांची गवळण लोकप्रिय असून भक्त आणि परमेश्वर यांच्यातला अद्वैत्व या गवळीतून सांगितले आहे. तुझी संगती नाही कामाची, मी सुंदरा कवळ्या मनाची.,वारीयाने कुंडल हाले, डोळे मोडीत राधा चाले, राधा पाहून भुलले हरी,बैल दुभे

नंदाघरी.यासारख्या अनेक गवळणी संत एकनाथांच्या प्रसिद्ध आहेत गवळण हा रचनाप्रकार संत एकनाथांनी लोकप्रिय केला असे म्हटले जाते.

३) **भूपाळी:-**

भूपाळी हा प्रात समयी गायला जाणारा गद्य पद्य प्रकार आहे.भूपाळी म्हणजे मनुष्यमात्रांना झोपेतून जागे करण्यासाठी म्हणावयाचे सुंदर गीत. प्रातःकाली देवाचे नाव मुखी यावे या प्रेरणेतून भूपाळीची रचना झाली असल्याचे दिसते. राम प्रहरी अशा नामस्मरणामुळे काया वाचा आणि चित्त शुद्ध होते. या श्रद्धेने भूपाळी अळवली जाते. सर्वसामान्यांची भक्ती भावना भूपाळीतून व्यक्त होते भूपाळी हा शब्द भुपावली या संस्कृत शब्दाचे अपभ्रष्ट रूप होय. भूप रागाच्या पंकती.या अर्थाने तो शब्द रूढ झाला आहे. देव निद्रिस्त आहे त्याला जागृत करण्यासाठी भूप रागात गावयाचे हे पद आहे. अनेक संतांनी भूपाळी ची रचना करून लेखन केले आहे. समर्थ सांप्रदायातील रामानंद यांच्या अनेक भुपाळ्या प्रसिद्ध असल्याचे आपल्याला दिसून येते.पुढे संतांपासून प्रेरणा घेऊन शाहिरांनी देखील भूपाळी लिहल्याचे दिसून येते.यात होनाजी बाळा यांची घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला, उठ लवकरी वनमाळी उदयाचली आला. ही भूपाळी खूप लोकप्रिय आहे. या एका भूपाळीने होनाजी बाळा यांना अमर केलेअसे म्हटले जाते.

5) **आरती:-**

सगुण उपासनेत देवाची पूजा करण्याचे सोळा उपचार आहेत. त्यापैकी आरती हा एक उपचार.देवपूजेत नैवेद्य अर्पण केल्यानंतर आरती म्हटली जाते. आरतीत देवाचा गौरव असतो, मूर्तीवर्णन असते देवतेच्या अवतार कार्याचे वर्णन असते. देवतेच्या मूर्तीवर्णनातून अथवा गुणगौरवातून तत्कालीन समाजाला अपेक्षित असणाऱ्या सर्व संकेतांची आदर्श पाहावयास सापडतात. आरती समुदायाने म्हणावयाची असल्यामुळे आरतीच्या रचनेत प्रासादिकता आणि गायन सुलभता असते. शब्दातील नादमाधुर्य आणि शब्दरचनेतील तालबद्धता यातून भक्ती भावनेची उत्कट अवस्था निर्माण होते. संत नामदेवांची पांडुरंगावरील आरती प्रसिद्ध आहे युगे अठ्ठावीस विटेवरी उभा, वामांगी रखुमाई दिसे दव्य शोभा ही त्यांची आरती सर्वतोमुखी आहे

तेव्हा तेराव्या शतकात निर्माण झालेल्या वारकरी संप्रदायाने जगताना आलेले अनुभव व्यक्त करण्यासाठी त्या काळात वेगवेगळे रचना प्रकार निर्माण केलेले आपल्याला दिसून येतात. त्यात अभंग, ओवी ,गवळण भारुड,भूपाळी, आरती,पदे स्तोत्र यासारख्या विविध रचना प्रकारातून त्यांनी अध्यात्माबरोबरच समाजाला शिकवण दिली.सर्वसंग्रहाकता डोळस भक्ती,सामाजिक नीतीची शिकवण संतांनी दिल्यामुळे ही संत साहित्याची फार मोठी फलश्रुती आहे. अध्यात्मिक विचाराबरोबरच नैतिक विचारांचे अधिष्ठान त्यांच्या लेखणीला आपल्याला लाभलेले दिसून येते.या शिवाय त्यांनी विविध रचना प्रकार देखील आपल्याला निर्माण केलेले दिसून येतात.

**संदर्भ ग्रंथ**

1) प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास - अ.ना.देशपांडे
2) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास. - ल. रा.नसिराबादकर
3) प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास. - प्रा. भुजंग वाडीकर